# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक :११-०१-२०१२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनांक ११-०१-२०१२ रोजी मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.१२.४५ वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला उपआयुक्त (प्र.) श्री. रविंद्र निकम ,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री तुपे त्रिंबकराव गणपतराव

२. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

३. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव

४. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष

५. स.स.श्री.राजगौरव हरीदास वानखेडे

६. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद

७. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग

८. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल

९. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव

१०. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर

११. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर

१२. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु

१३. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव

१४. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव

१५. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल

१६. स.स.श्री.बोराडे रामदास काशीनाथ

१७. स.स.श्री.घोडिले आनंद राधाकिसन

१८. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत

१९. स.स.श्री.चौधरी संजय सांडू

२०. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ

२१. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश

२२. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी

२३. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद

२४. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान

२५. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार

२६. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
२७. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
२८. स.स.श्रीमती कविता संजय जाधव
२९. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
३०. स.स.श्री.मुजीबखान मीर आलमखान
३१. स.स.श्रीमती करीमुन्नीसा बेगम जमीलखान
३२. स.स.श्री.अफसरखान यासीन खान
३३. स.स.श्री.मोहम्मद मुजीबउद्दीन कदिरोद्दीन
३४. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
३५. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
३६. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
३७. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
३८. स.स.श्री.शेख हबीब शेख छोटु कुरेशी
३९. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
४०. स.स.श्री.खान आगा मिया खान
४१. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
४२. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
४३. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
४४. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
४५. स.स.श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत
४६. स.स.श्री.मधुकर दामोधर सावंत
४७. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
४८. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा
४९. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
५०. स.स.श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
५१. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
५२. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
५३. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
५४. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
५५. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने

५६. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव

५७. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र

५८. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम

५९. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव

६०. स.स.श्री.जोशी संजय रामदास

६१. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश

६२. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव

६३. स.स.श्री.अब्दुल सिकंदर अब्दुल साजेद

६४. स.स.श्री.जैन विकास रतनलाल

६५. स.स.श्री बारवाल गजानन रामकिसन

६६. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने

६७. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन

६८. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश

६९. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव

स.स.श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद

श्री.अफसर खॉन :या सभागृहाचे स.सदस्य व माजी सभापती श्री.अ.साजेद अ.सत्तार यांचे दु:खद निधन झाले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.संजय केनेकर :यास माझे अनुमोदन आहे.

श्री.गजानन बारवाल :सर्वाचे आवडते माजी सभापती व या सभागृहाचे स.सदस्य श्री.अ.साजेद अ.सत्तार यांचे नुकतेच निधन झाले मी सभागृह नेता असतांना दीड वर्षाच्या माझ्या कार्यकाळात त्यांना जवळून पाहिले ते स्थायी समितीचे सभापती होते.त्या दीड वर्षाच्या कार्यकाळात अतिशय चांगल्या पध्दतीने त्यांचे काम होते काम करतांना त्यांचे सहकार्य मिळाले अतिशय चांगले स.सदस्य होते या शहरात व महाराष्ट्रात त्यांनी नाव कमावले ते अतिशय अभ्यासू होते सभापती असतांना एक वेगळयाच प्रकारची प्रतिमा त्यानी या महापालिकेत उमटवली होती ज्या ज्या प्रभागातून ते निवडणूकीस उभे राहिले तेथून ते २ वेळेस बिनविरोध निवडून आले या सभागृहा पुढे अतिशय महत्वाच्या भुमिका त्यांनी मांडल्या व एक अभ्यासपुर्वक प्रस्ताव त्यांनी दिला होता की अधिकृत अनधिकृत व व्यावसायिक नळ कनेक्शन किती त्याबध्दल त्यांनी एक

अहवाल दिला होता. मी माझे व माझ्या परीवारातर्फे व वार्डातील सर्व नागरीकाच्या तर्फे त्यांना भावपुर्ण श्रध्दाजंली अर्पण करतो.

मा.महापौर :या सभागृहाचे दिर्घकाळ स.सदस्य म्हणून राहिलेले स. श्री. अब्दुल साजेब अ.सत्तार यांचे नुकतेच दु:खद निधन झाले त्यांना सभागृहातर्फे श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी सर्वांनी उभे रहावे.

या वेळी अ.साजेद अ.सत्तार यांना सभागृहाच्या वतीने ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून भावपुर्व श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

चर्चा :

श्री.त्रिंबक तुपे :मालवन येथे समुद्रात ३ कि.मी. पोहण्याची दिनांक ८ रोजी स्पर्धा होती ही महाराष्ट्र राज्य पातळीवरील स्पर्धा होती या स्पर्धेत या महापालिकेचे उपआयुक्त श्री॰ रविंद्र निकम व आजच्या बैठकीचे प्र.आयुक्त यांनी भाग घेतला होता या स्पर्धेसाठी एक तासाचा वेळ होता परंतु उपआयुक्त श्री. रविद्र निकम यांनी हे अंतर ४० मिनिटाच पार केले त्याबध्दल त्यांचे सभागृहाच्या व प्रशासनाच्या वतीने अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

श्री.संजय केनेकर :माझे यास अनुमोदन आहे. माझ्यातर्फे अभिनंदन करतो.

श्री.प्रमोद राठोड :या महापालिकेचे उपाआयुक्त श्री.रविंद्र निकम व आजच्या सभेचे प्र.आयुक्त यांचा जो अभिनंदनाचा ठराव ठेवला त्यांनी त्या स्पर्धेत अव्वल स्थान मिळविलेले आहे तसेच त्यांनी या महापालिकेत काम करतांना त्यांनी त्यांचे कार्यकाळात अव्वल स्थान रहावे जेणे करून या महापालिकेत त्यांचे चांगले नाव होईल त्यांना पुढील शुभेच्छा देवून त्यांचे अभिनंदनाच्या ठरावास अनुमोदन देतो.

मा.महापौर :मालवन येथे ३ कि.मी. समुद्रामध्ये जी पोहण्याची स्पर्धा होती त्या स्पर्धेत या महापालिकेचे उपआयुक्त श्री. रविंद्र निकम यांनी सहभाग घेतला होता हे अतं्र १ तासामध्ये पार पाडायचे होते परंतु त्यांनी फक्त ४० मिनिटात पार केले महापालिकेचे काम सांभाळून त्यांनी या स्पर्धेत भाग घेवून एक छंद जोपासून एक आदर्श ठेवलेला आहे आणि या यशाबध्दल सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

श्री.संजय केनेकर :आजची महत्वाची सभा महत्वाचे मुद्दे आजच्या सभेचे आहे सभेची माहिती मा.आयुक्तांना असतांना ते आज उपस्थित नाही याची कल्पना आपल्याला आहेत की नाही.नेमके मा.आयुक्त कुठे गेले आपली परवानगी घेतलेली आहे का खुलासा करावा.

श्री.नासेरखॉन :मा.आयुक्त कामानिमित्त गेले असतील परंतु बाकीचे अधिकारीही येथे उपस्थित नाही.पदाधिकारी आपण सर्व येथे आलो. जबाबदार अधिकारी उपस्थित नाही सर्व मा.आयुक्ता सोबत गेले का,

मा.आयुक्त :मा.आयुक्तांचे पत्र आताच माझ्याकडे प्राप्त झालेले आहे.जे कोणी अधिकारी आज गैरहजर आहेत त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात येतील.

श्री.त्रिंबक तुपे : मा.आयुक्तांचे पत्र आले असेल परंतु आज महत्वाची बैठक आहे अनेक निर्णय महत्वाचे आहे घरकुलाचा विषय असेल.त्यावर चर्चा होणे गरजचे आहे मा.आयुक्त नसतील व अधिकारी वेळेवर येत नसतील तर या विषयावर काही निर्णय होणार नाही माझी विनंती की ही सभा तहकूब करून पुढील तारीख दयावी.

श्री. खाजा शरफोद्दीन :मा.आयुक्त कामानिमित्त गेले असतील उर्वरीत अधिकारी कुठे गेलेले आहे.

श्री.अफसर खॉन :विषय पत्रिका निघाली सर्व माहित आहे कोणते असे महत्वाचे काम होते की मा.आयुक्त यांनी गैर हजर राहण्या बाबत पत्र दिले त्याच बरोबर उर्वरीत अधिकारी ही गैरहजर आहे.

मा.महापौर :मा.आयुक्ताचे पत्र आताच माझेकडे प्राप्त झालेले आहे. तसेच प्रकल्प संचालक श्री. जावरे याची रजा असल्याचे पत्र मिळाले.जे अधिकारी हजर नाहीत त्यांना कारणे दाखवा नोटीस देवून जी कार्यवाही करायची ती होईल.

श्री.खाजा शरफोद्दीन :उर्वरीत अधिकारी नाही त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे

श्री.प्रमोद राठोड :मा.आयुक्त सभेला नाहीत अधिका-यांना माहित होते आपण सुध्दा सर्व सदस्यांना कळवायला पाहिजे होते.

श्री.गिरजाराम हळनोर : आजची सभा तहकूब करावी मा.आयुक्त राहतील त्यावेळी सभा घ्यावी जे अधिकारी अनुपस्थित आहे न सांगता गेले त्यांचेवर कार्यवाही करावी.

यावेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात

मा.महापौर :एका वेळी एकाच सदस्यांनी बोलावे , चार वेळेस सांगितले की जे अधिकारी आज येथे गैरहजर आहे त्यांना कारणे दाखवा नोटीस दिली जाईल व त्यांचेवर काय कार्यवाही करायची ती सर्व पदाधिकारी एकत्रित बसून निर्णय घेवू मा.आयुक्ताचे पत्र मला आताच प्राप्त झालेले आहे.

श्री.रेखा जैस्वाल :मा.आयुक्त का उपस्थित नाही पत्रामध्ये काय लिहले आहे.

श्री.मुजीब खान :एक वर्षा पासून पाहतो स.सदस्य सकाळी १०.३० पासून १.०० वाजेपर्यत महापालिकेत विविध विभागात जातात त्यावेळी तेथे शिपाई असतात अधिकारी भेटत नाही तेथील कर्मचारी अधिकारी कोर्टात गेले् घरी आहे मा.आयुक्ताकडे बैठकीला गेले अशी उत्तरे मिळतात तर कोणत्या बैठका होत आहे , माहिती घेतल्यास मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र मा.आयुक्ताच्या घरी बैठका चालू आहे अधिकारी तेथे जावून संचिकावर सही आणतात महापालिकेचा कारभार चालतो की पर्सनल काम चालते खुलासा करावा.

मा.महापौर :मा.आयुक्त आजच्या सभेला उपस्थित नाही त्यांचे समोर खुलासा झाला पाहिजे.

श्री.त्रिंबक तुपे :स.सदस्य श्री. मुजीब खान यांनी जो मुद्या मांडला त्यासी सहमत आहे परंतु हा मुद्या मा.आयुक्ताच्या समोर यायला पाहिजे आज मा.आयुक्त

| | |
|---|---|
| | उपस्थित नसल्यामुळे खुलासा होणार नाही त्यासाठी आजची सभा तहकूब करावी.नंतर आपल्या निर्णयाप्रमाणे ती घेण्यात यावी. |
| श्री.सुशिल खेडकर | :प्र.आयुक्ताकडून खुलासा घ्यावा मा.आयुक्त का उपस्थित नाही |
| श्री.मुजीब खान | :सभा तहकूब करावी मा.आयुक्त आल्यानंतर खुलासा घ्यावा. |
| श्री.विजय वाघचौरे | : मा.आयुक्त कुठे गेलेले आहे.प्र.आयुक्त यांचेकडून खुलासा घ्यावा |
| मा.महापौर | :प्र.आयुक्त या बाबतीत खुलासा करतील. |
| श्री.त्रिंबक तुपे | :एक दिवसात मा.प्र.आयुक्त काय काम करणार आहे. |
| उपआयुक्त (प्र.) | :मा.आयुक्ताचे जे निर्णय आहे ते स्वतः मा.आयुक्त घेतात त्यावर मी जास्त भाष्य करू शकत नाही. |

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

| | |
|---|---|
| श्री.प्रमोद राठोड | :उर्वरीत अधिकारी का उपस्थित नाही.हा खुलासा करावा. |
| श्री.त्रिंबक तुपे | :प्र. आयुक्त यांना व्यवस्थीत खुलासा करता येत नसेल समाधानकारक देवू शकत नसतील तर आजची सभा तहकूब करावी. |
| मा.महापौर | :आजची सभा तहकूब करण्यात येते लवकरच पुढील सभेची तारीख कळविण्यात येईल. |

या बरोबर सभा तहकूब झाल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगरसचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद.